


**SHRI SHAHU CHH. SHIKSHAN SANSTHA'S**

# R.S.C. INSTITUTE OF PHARMACY

**2968, 'C' WARD, DASARA CHOWK, KOLHAPUR- 416002**

**Website – www.rscpharmacy.org  Email – rscpharmacy@yahoo.in**

---

## प्रवेशाबाबत सूचना

सन 2017–18 या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश घेण्यासंबंधीच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.

1. सर्व इच्छूक उमेद्वारांनी शासनाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये(CAP) अर्ज दाखल करणे अनिवार्य आहे.
2. त्याबाबतची सूचना वर्तमानपत्रामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रसिद्ध केली जाते.**(www.dte.org.in)**
3. 80% प्रवेश (48जागा) केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारा (CAP) शासन भरणार आहे.
4. 20% प्रवेश (12जागा) इन्स्टिटयूट लेवलवर(IL) (पूर्वीचे नाव मॅनेजमेंट कोटा) कॉलेजमार्फत भरणेत येईल. परंतू याकरीतासुद्धा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये(CAP) भाग घेणे अनिवार्य आहे.
5. इन्स्टिटयूट लेवल (IL) चा कोटयामधून प्रवेश घेण्यासाठी कॉलेजचा स्वतंत्र प्रवेश अर्ज भरणे अनिवार्य आहे.
6. ज्या विद्यार्थ्यांनी (CAP) चा फॉर्म व कॉलेजचा फॉर्म भरलेला आहे. त्यांच्या अर्जामधून इन्स्टिटयूट लेवलच्या जागा भरण्यात येतील.
7. इन्स्टिटयूट लेवलकरीता कॉलेजचे फॉर्मस् उपलब्ध करणेबाबत वर्तमानपत्रात व कॉलेजच्या संकेतस्थळावर जाहीरात दिली जाईल. त्यातील वेळापत्रकाप्रमाणे त्याची कार्यवाही होईल.
8. शिष्यवृत्ती व सवलती (फक्त केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमधून प्रवेश केलेल्या विदयार्थ्यांना लागू.)

   अ. मागासवर्गीय (SC,ST,DT/VJ,NT,SBC) विद्यार्थ्यांनी फक्त Development फी भरणेची आहे. त्यांना टयूशन फी माफ आहे.

   ब. इतर मागासवर्गीय (OBC) विद्यार्थ्यांना टयुशन फीमध्ये 50% सवलत आहे

   क. आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता टयुशन फीच्या 50% रक्कम शासनाकडून नंतर परत मिळते. परंतू त्यांनी प्रवेश घेताना सर्व फी भरावयाची आहे.
9. मागासवर्गीय (SC,ST,DT/VJ,NT,SBC) विद्यार्थ्यांकरीता जात/जमात प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)
10. मागासवर्गीय (SC,ST,DT/VJ,NT,SBC) विद्यार्थ्यांकरीता जात/जमात प्रमाणपत्र वैधता प्रमाणपत्र (सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)
11. नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र (अनुसुचित जाती/अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय उमेदवारासाठी)
12. अधिवास प्रमाणपत्र (प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या प्रकरणी आवश्यकतेनुसार)
13. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (TFWS योजनेअंतर्गत प्रवेश घेवू इच्छिणा–या उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी यांनी विहीत प्रपत्रात निर्गमित केलेले)

1. अंपगत्वाचे प्रमाणपत्र/Defence / अल्पसंख्यांक इ. संवर्गातून प्रवेश घेवू इच्छिणा–या उमेद्वारांच्या प्रवेशासाठी विहीत नमुन्यात प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.
2. आधार क्रमांक व संलग्नित बॅक खाते : शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती . योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक
3. टयुशन फी शिक्षण शुल्क समिती (FRA) मार्फत जाहीर करण्यात येते.
4. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे (CAP) अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत जाहीर केलेल्या फॅसिलिटी सेंटरवर मिळतील. त्यासंबंधीची सर्व सविस्तर माहिती तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत वेळोवेळी त्यांच्या संकेतस्थळावर व स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर केलेली असते.

सर्व प्रवेशार्थी विद्यार्थ्यांनी वरील सुचना समजून घेवून त्याप्रमाणे केंद्रिभूत प्रवेश प्रकियचे **(CAP)** प्रवेश अर्ज भरणेचे आहेत. याची नोंद असावी.

<u>महत्त्वाची सुचना:–</u> मागील शैक्षणिक वर्षात काही उमेद्वारांनी प्रवेश प्रक्रियेदरम्यान

काही प्रमाणपत्रे जसे जात/जमात प्रमाणपत्रे /जातवैधता प्रमाणपत्रे /अंपगत्वाचे प्रमाणपत्र/नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्रे ही सक्षम प्राधिका–याकडून प्राप्त करून न घेता बनावट प्रकारची सादर केल्याचे पडताळणीअंती आढळून आले होते. अशा उमेदवारांचा प्रवेश रद्द करून त्यांचे विरूदध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आता प्रवेशोच्छुक उमेद्वारांना पुनश्च सूचित करण्यात येते की, त्यांनी सक्षम प्राधिका–याकडून प्रमाणपत्रे प्राप्त करून न घेता बनावट अथवा खोटी प्रमाणपत्रे प्रवेशासाठी सादर केल्याचे आढळल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करून त्यांचे विरूद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

तसेच प्रवेश घेताना जात/जमात प्रमाणपत्र जातवैधता प्रमाणपत्र /उत्पन्नाचे प्रमाणपत्र इ. ज्या विदयार्थ्यांना जी जी प्रमाणपत्रे लागू होतात ती सर्व मूळ प्रतीत असल्याशिवाय कोणासही प्रवेश दिला जाणार नाही.